प्रति,

मा. कुलसचिव ,

सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ ,

पुणे-१

## 'मराठी भाषा गौरव दिन'

## अहवाल

सहकार महर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात महाविद्यालय मराठी विभाग व अंतर्गत गुणवत्ता सुधार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२७ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी १०:०० वा. **मराठी भाषा गौरव दिन** हा उपक्रम महाविद्यालयात साजरा करण्यात आला.या निमित्ताने महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने **कविवर्य कुसुमाग्रज तथा वि.वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पुजन** करण्यात आले तसेच,**काव्यवाचन** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ. दिनानाथ पाटील**, उपप्राचार्य **डॉ. बाळासाहेब वाघ** आदी. मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रम प्रसंगी उपस्थिताना मार्गदर्शन करताना डॉ.दिनानाथ पाटील यांनी मराठी भाषेच्या विकासासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे तसेच वाचन संस्कृती जोपासली पाहिजे या उपक्रमामध्ये एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख **प्रा. राजेंद्र जोरवर** यांनी केले तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन **प्रा.पल्लवी गडाख** यांनी केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेतर सेवक वृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.